# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

पुर्वीचे पुणे विद्यापीठ

दुरध्वनी क्र. ०२०—२५६०१२१३ गणेश खिंड
फॅक्स . ०२०—२५६०१२०८ पुणे. ४११००७
वेबसाईट www.unipune .ac.in ई. मेल : coe@unipune.ac.in

---

संदर्भ क्र./परीक्षा/बी. ए./ 1410 दिनांक: २१/१२/२०१८

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्न कला महाविद्यालये

विषय :— बी.ए. ऑक्टोंबर/नोव्हेंबर २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेच्या गुणपत्रके व पासिंग सर्टिफिकेट वितरणाबाबत...

महोदय/महोदया,

ऑक्टोंबर/नोव्हेंबर २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या बी.ए. (२००८ व २०१३ पॅटर्न) परीक्षेचा निकाल अनुक्रमे दिनांक ११/१२/२०१८ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे. परीक्षेची गुणपत्रके व पासिंग सर्टिफीकेट खालीलप्रमाणे वितरीत करण्यात येत आहेत.

१. पुणे शहरातील व पुणे जिल्हयातील महाविद्यालयांनी शुक्रवार दिनांक २१/१२/२०१८ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत परीक्षा विभागातून गुणपत्रके घेवून जावयाची आहेत.
२. नाशिक जिल्हयातील महाविद्यालयांनी त्याच्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून शुक्रवार दिनांक २१/१२/२०१८ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत घेवून जावयाची आहेत.
३. अहमदनगर जिल्हयातील महाविद्यालयांनी त्याच्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून शुक्रवार दिनांक २१/१२/२०१८ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत घेवून जावयाची आहेत.
४. अहमदनगर जिल्हयातील अकोले, राहता, कोपरगाव आणि संगमनेर तालुक्यातील सर्व महाविद्यालयांनी त्याच्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके संगमनेर नगरपालिका आर्ट्स डी.जे. मालपाणी कॉमर्स आणि बी.एम. सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर येथून शुक्रवार दिनांक २१/१२/२०१८ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ यावेळेत घेवून जावयाची आहेत.

आपल्या महाविद्यालयामार्फत उपरोक्त परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके संबंधित विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था करावी. त्याचप्रमाणे एखाद्या विद्यार्थ्याच्या बुणपत्रकाबाबत काही शंका असल्यास विद्यार्थ्यांना परस्पर विद्यापीठात न पाठविता महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत अशी प्रकरणे तातडीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागात एकत्रित आणून द्यावीत. त्यानंतर त्यातील तांत्रिकता तपासून त्याबाबतची कार्यवाही करता येईल.

आपणांस विनंती करण्यात येते की, उपरोक्त नमुद केल्यानुसार आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल वेळेत घेवून जाण्याची व वितरण करण्याची व्यवस्था करावी.

कळावे,

आपला

उपकुलसचिव
(परीक्षा)

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी —**

१.विद्यापीठ उपकेंद्र प्रमुख, नाशिक/अहमदनगर यांनी सदर निकाल संबंधित महाविद्यालयांना देण्याची व्यवस्था करावी.
२. मा. प्राचार्य, संगमनेर तालुक्यातील सर्व महाविद्यालयांनी त्याच्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके संगमनेर नगरपालिका आर्ट्स डी.जे. मालपाणी कॉमर्स आणि बी.एम. सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर यांनी सदर निकाल संबंधित महाविद्यालयांना देण्याची व्यवस्था करावी.